

# एक पावसाळ्यात

शिरीष पै

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्रं. क्र. ९८३६

REFBK-0017538
REFBK-0017538

१९३६ ५०३

काव्य
८३५९३
३।३।८१

१९९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ८३५९३ वि. काव्य
पुस्तक क्र. १९३६ नोंद दि. ३।३।८१

# एका पावसाळ्यात

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७५३८
संग्रह शाखा (स्थान प्रत)

शिरीष पै

REFBK-0017538
REFBK-0017538

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

पॉप्युलर प्रकाशन

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ ताडदेव रोड
मुंबई ३४

© सौ. शिरीष पै

पहिली आवृत्ती
१९६९/१८९१

चित्रकार :
विनायक साठे

मुद्रक :
आर. के. मूर्ति
महाराष्ट्र पेपर्स प्रा. लि.
अत्रे आर्टस्, शिवशक्ती
वरळी, मुंबई १८

ही कविता

त्यांच्यासाठी...

...जे कवितेसाठी


SATHE

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १८५३८.

स्वच्छ निवळलेले आभाळ
जसे तुझे भाळ....निष्पाप....निरागस
मंद मंद वाहणारा वारा शीतळ
उंच माड हळु हळु झुलणारे
पहिल्या भेटीनंतरचे तुझे निःश्वास
प्रेमात तुडुंब बुडलेले माझे मन

किती भरात येऊन बहरले आहे हे झाड
गंधाची केवढी लयलूट!
उजाडण्यापूर्वीच गळून पडली आहे
साऱ्या फुलांची तळाशी रास
कशी बेभान पसरली आहेत मातीवर
स्वतःचा शेवट करताना........


SATHE

कोण कुणाच्या प्रेमात पडले आहे ?
कुणी कुणाला वेड लावले आहे ?
तूच समजावून सांग; मला संभ्रम पडला आहे.
कुणाला कापीत आहे अधिक, या व्यथेची धार
ह्या सुखाच्या स्वप्नात कोण हरवले आहे ?
कोण जाळीत आहे कुणाला,
कोण कुणावर करीत आहे वर्षाव ?
मिळत नाही प्रश्नाला उत्तर; तूच....तूच समजावून सांग
कुणी लावली आहे कुणाला काळीज सुकवणारी ही तहान ?
कुठून उगम पावतो,
कुठे वहात जातो समाधान देणारा झरा ?
तूच दाखव ना तोही
....पसरला आहे बघ केव्हापासून मी हात !


SATHE

माझ्या चिमण्या पिलांनो, माझ्यापासून सुखरूप रहा
जळत असताना कसे ठेवावे तुम्हाला सावलीत,
अजुन शिकले नाही
हसत असताना कसा भरवावा एकेक घास,
अजुन शिकले नाही
जेव्हा जेव्हा पराभव होतो माझा,
शिक्षा करते तुम्हालाच
पण कसे भांजून घ्यावे मनगट स्वतःचे,
अजुन शिकले नाही

माझ्या चिमण्या पिलांनो, नका पाहू स्वप्ने माझी
किती दिवस झाले दूर गेले आहे,
तुमच्यापासून हरवले आहे
स्वतःचे जग निर्माण करताना तुम्हाला विसरले आहे
किती रंगात आला आहे तुमचा खेळ,
ओठ उमलले आहेत
धिक्कार असो मला !
मिटून पाकळ्या मी मात्र मुकी झाले आहे



तू दिलेले सुंदर औदासिन्य
जशी पावसाळ्यातली संध्याकाळ
काहीच नसताना एकाएकी
सुन्न भरून आले आहे आभाळ
कुठून आले आहेत हे व्याकुळ करणारे काळे ढग
भरून येत आहेत, आल्यावरही पुन्हा पुन्हा
कधीच का थकणार नाही हा पाऊस
प्रलयाच्या काळोखात दिवसरात्र बुडवताना ?


SATHE

आपले पाय चालत असतात एका अज्ञात संकटाची वाट
लाटेमागे फुटत जाते आंधळी होऊन एकेक लाट
पुन्हा पुन्हा उजळून मिसळतो प्रकाश काळोखात
विझून विझून परत जळतात आपलेच हे मातीचे हात
ठाऊक असते सारे काही.... सारे काही दिसत असते
वाहण्यासाठी जन्मलेली एक जखम इमानाने वहात असते
....अशीही एक लढाई असते जिचा शेवट असतो पराभव
वाया जाण्याकरिताच घ्यायचे असतात
असे काही काही अनुभव


SATHE

रुतत चालले आहे मी माझ्या आत्म्यासह
वाळूच्या कणाकणातून
लाटांच्या स्पंदनातली एकेक गर्जना साठवीत
उरातून क्षितिजापाशी
क्षितिजही ओलांडून पसरले आहे दूरच्या अज्ञात प्रदेशात
घोंगावणाऱ्या वाऱ्याला मागे टाकून वहात आहे सारखी पुढेच
मुळापासून शेंड्यापर्यंत डुलणाऱ्या माडांना मिळाले आहे
पोचले आहे इतकी उंच की थेट वादळलेल्या मेघांमध्ये
घेते आहे सामावून आकाशाला....
ते सुद्धा आज अपुरे आहे
अशी लुटताना, उधळताना झाले आहे
अपार.... अनावर....
—तरी तितकी नाहीच जशी
तुझ्यापर्यंत पोचताना होत असते


SATHE

दोन दिवस? म्हणजे दोन वेळा चोवीस तास
प्रत्येक क्षणातून दाटलेला तुझ्या आठवणींचा गडद वास
येईल का पुसता हा सारा काळ पाटीवरल्या चित्रांसारखा?
दूर फेकणाऱ्या काळोखात घुमत आहेत लक्ष हाका
हे सारे कोठपर्यंत? न संपण्यासाठीच का ही वेदना?
किती व्याकुळ झाला आहेस तू सुद्धा सहन करताना
मिसळतो आहे पुरात पूर, नाही रे अडवता येणार
एकदा उगम पावल्यावर हा प्रवाह वाहतच जाणार........



हे आर्द्र ओथंबलेल्या मेघांनो,
तुमचा प्रवास सुखकर होवो !
किती अस्थिर....अपार....अमर्याद झाला आहात !
विराट होऊन पसरताना
गिळून टाकले आहे तुम्ही आकाशाला
कुठून आलात, कुठे जाणार आहात ?
स्वतःला कुठवर उधळणार आहात ?
उधळताना किती कफल्लक होणार आहात ?

हे उत्कट, अविचारी मेघांनो,
अशाच ओथंबून फिरत असतात
माझ्या स्वप्नांच्या सावल्या
पसरतात दूर तुमच्याच गतीने
घेतात आकार तुमचे
प्रतिक्षणी पालटणारी अनंत रुपे गोळा करीत
मी उभी असते इथेच
पसरुन हात, मागत काही, न मिळणारे
व्याकुळ असण्याचा हा प्रयत्न अजुन चालू आहे
रिक्त झाल्यावरही.......


SATHE

वाढ, वाढ,
सारखा वाढ !
बीजामधून
ये फुटून
अंग घुसळ
वर उसळ
हजार फांद्यातून पसर
लाख पानात
नाच तालात
पारंबीच्या झिंज्या सोड
आकाशाची लागून ओढ
वडासारखा आडवा तिडवा
माडासारखा सरळसोट
असा वाढ,
तसा वाढ,
वाढ, वाढ,
सारखा वाढ !


SATHE

मुसळधार पाऊस
वाट नको पाहूस
चहूकडून वाढणारे पाणी
कोसळण्याचा एक ध्वनी
पायरीमागून बुडते पायरी
लाव दार आता तरी
एकटी वाऱ्याशी झुंजून
खिडकी केव्हाच गेली मोडून
मगापासून थांबलेले झाड
तेही कोसळले....कडाड....
नुसता काळोख....नुसते वादळ
नुसते वेढणारे भयाण जळ
या रात्रीतून नाही पहाट
किती किती बघशिल वाट
अशी झाली होती सुरुवात
असा होणार आहे अंत
त्याची खंत नको मानूस
आता वाट नको पाहूस—


SATHE

कुणास ठाऊक असे का झाले आहे ?
प्रकाशातून वाट सापडल्यावर
पुन्हा काळोखात बुडाले आहे
दुथडी भरून वाहताना
पूर्वीइतकीच ओसरले आहे
सारे सारे मिळाल्यावर
इच्छेलाच मुकले आहे

चहूकडून चालून येत आहे
गडद, दाटलेला काळोख
पेटवली नाही तोच—
मशाल विझून गेली आहे
इथेच....इथेच कदाचित वाटेल
पुन्हा एकदा जिवंत झाल्यासारखे....


SATHE

खरोखरीच मोठा आहेस तू माझ्यापेक्षा....कितीतरी
मीसुद्धा लहान नाही (तुझ्याहून असले तरी)
पण आपल्याहून मोठे आहे आपले प्रेम....
आपण निमित्तमात्र....

वेगवान प्रवाहातल्या होडीप्रमाणे अनिश्चित
दिले आहेत भिरकावून आपण आपले आत्मे
मिळत असते गती ज्यांना अनाकलनीय अज्ञातातून
पोचत नाही जिथे कुणाचीच नजर....कुणाचेच हात....
आपला प्रवास चालूच आहे न थकता
अंतापासून उगमाकडे....प्रकाशाचे मूळ शोधीत

पुन्हा लाभलेला हा प्रेमजन्म इतका सोपा नाही
जितके सोपे होते आधीचे मरण....आपण मागितलेले


SATHE

अशा ठिकाणी आले आहे जिथे भिती नाही
जिथे झाला आहे सगळ्या शंकांचा शेवट
ठेवली आहे मान अशा खांद्यावर निर्धास्त
जिथून होत नसतो विश्वासाचा कडेलोट
ठेवले आहे मस्तक अशा बुलंद छातीवर
जिच्यात गर्जत असताना नित्य वादळे....केवळ माझ्यासाठी
प्रत्येक वादळाचा शेवट होतो एका अद्‌भूत संगीतात
ज्यातून पाझरणारा प्रत्येक मुलायम सूर....केवळ माझ्यासाठी


SATHE

एका पावसाळ्यात लिहिलेली ही असंख्य प्रेमपत्रे
प्रीतीच्या वर्षावात भिजलेले अनंत आर्द्र शब्द
ही न संपणारी आश्वासने....कोसळताना दिलेला धीर
पावसात चिंब नाहलेली ही विरहाची दीर्घ रात्र
हा दुरावा आकाशभर पसरलेल्या काळ्या मेघासारखा
ओल्या काळोखातून परस्परांना दिलेली ही आर्त हाक
अथांग भिजलेल्या मातीप्रमाणे ही थकलेली गात्रे
थंडगार वाऱ्यासारखी वहात आलेली ही व्याकुळ आठवण
दूर दूर असल्याने जाणवणारा हा मीलनाचा गंध
अन् हळु हळु झिरपणारी ही आसक्तीची तीव्र धार....


SATHE

गुहेमधल्या घनदाट काळोखातून दिसावी
खोल जळणाऱ्या दिवटीची जीभ तांबडीलाल
तशी पाहिली तुझ्यात हलणारी तुझी सावली
तुला क्रमाक्रमाने झपाटत जाणारी

ओसाड स्मशानातून एकाकी भटकणाऱ्या
पावलांचा तुझ्यात घुमणारा जुना नाद
धगधगत्या निखाऱ्यावर भाजलेल्या छातीतून
झिरपणारे एक विस्कटलेले शोकगीत

सुरीच्या धारेवर हळु हळु फिरणारा
तुझा राकट हात....तुझी बोटे रक्तबंबाळ
स्वतःची हत्या करताना तुला खून चढला आहे
तुझ्या रक्ताइतकाच दाट....चिकट....काठोकाठ

किती भयंकर....आकर्षक....हवाहवासा वाटतो आहे
तुझ्यात जागा झालेला तुझ्यामधला सैतान


SATHE

हा न संपलेला न संपणारा राग
वारंवार जागवणारा....जिवंत करणारा
हा प्रक्षोभक, चैतन्यमय, रसरसलेला राग
व्याकुळ करणारा हा अनावर राग
हा हताश, फसलेला, फसवणारा राग
उसळून पराभव पावणारा हा दुर्बळ राग
हा राग, हेतु नसलेला, परावलंबी, निराधार, निराश्रय
पायाखालची जमीन जाळणारा हा विध्वंसक राग
भडकलेले पंख पसरून विराट आकाशात
पिसाट फिरणारा हा दिशाहीन उध्वस्त राग
हा राग....अधूनमधून रडणारा, कोंडून फुटणारा
स्वतःवर घाव घालताना थकलेला हा आंधळा, अर्धवट राग
कुठेच मावू न शकणारा हा राग अफाट, बलशाली
हा, असा, तसा, कसाकसाही असलेला राग
कोसळताना प्रेमात विझणारा हा कोमल राग


SATHE

निळ्या पोलादी रंगाचे आकाश....
तीच निळी छटा समुद्रावर
इथे बसून रचला होता काल एक किल्ला मी वाळूवर

सगळे रस्ते शेवटी समुद्राला मिळतात....येताना म्हटले होते
जुळवावे नाही लागत हे रक्ताशी जडणारे रक्ताचे नाते

खूप अंधार पडतो....नुसत्याच सावल्या हलू लागतात
परत आलेले कोळी आपापली जाळी गुंडाळून नेतात

पलीकडच्या तीरावर जळणारे अंधुक दिवे
सांगतात रोजचीच कथा
तरीसुद्धा भास होतो....घडणार आहे....जे घडले होते....
इतक्यात....आता....


SATHE

एप्रिल महिन्याचा आरंभ....दहा दिवस उलटून गेले
अकस्मात आलेल्या वातचक्रात पुन्हा एकवार जग हरवले
फडफडत आले वाऱ्याचे प्रचंड झोत
गदगदा हलवीत माडांना
विजेसारखी लखलखली धूळ थेट आकाशापर्यंत पोचताना
दिसेनासे झाले काही दाही दिशा हरवून गेल्या
खाली....वर....धूळ....धूळ....
साऱ्याच वाटा धुळीत बुडल्या
घराघरातून घुसले वारे....धुळीचा आला महापूर
डोळे उघडून पाहिले तेव्हा जवळच्या वस्तू गेल्या दूर


SATHE

पृथ्वीच्या पाठीवर झपाट्याने उतरणारा काळोख....
समुद्र दूर गेला आहे
चल ना जाऊ तिथे....जिथे संपते वाळूची शेवटची हद्द
ह्या ओहोटीच्या वेळी कुणीच उरलेले नाही समुद्रकिनाऱ्यावर
फक्त गरम दबलेली हवा....फक्त तू....फक्त मी....
फक्त एक तीव्र ओढ....जळणारी....फक्त हवी असलेली हुरहूर
नको समजूस....नको नको रे समजूस हे स्वप्न आहे

कोण खेचून नेतो ह्या लाटांना किनाऱ्यापासून दूर
त्या हातांना विचार की हे सारे स्वप्न आहे का?
वाट चुकलेल्या मिणमिणत्या चांदण्या
करीत आहेत अजून प्रवास
विचार ना त्यांनाच की हे सुद्धा सारे स्वप्नच का?
विचार....विचार ना साऱ्या ओसाड आसमंताला
कळवळून एकदा तरी
हे स्वप्न आहे का? स्वप्न आहे का? सारे स्वप्नच का?

नाहीतर पकड माझा हात तुझ्या वज्रमुठीत एकदाच
आणि चल ना तिथे....जिथे संपते वाळूची शेवटची हद्द


SATHE

शांत बहरलेली रात्र....आकाश कसे जवळ आले आहे
तेज गोठावे तसे साठले आहेत
पांढऱ्या ढगांचे पुंजके दक्षिणेला
चांदण्या देखील मोजून घ्याव्यात इतक्याच....
विखुरलेल्या....स्निग्ध

उंच इमारती झाल्या आहेत अबोल....
दिवे केव्हाच विझून गेलेत
वारा फक्त झुळझुळत आहे पडद्यांना हेलकावे देत किंचित
लांबलचक पसरले आहेत रस्ते निर्जन....पावले दूर गेलेली

सारेच स्वर बुडाले आहेत निद्रेच्या संथ प्रवाहात खोल
जाणवतो आहे फक्त शांततेचा रंग
गडद....गंभीर....काळाभोर
पलीकडे सारेच आकार हरवले आहेत....त्यात माझाही


SATHE

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
दा. क्र. ९०४३८
संग्रह शाखा

जवळ असताना उगीचच निर्माण झालेला अकल्पित दुरावा
असे का पसरले आहे विस्तीर्ण वाळवंट दोघांच्या दरम्यान
किती बघशील....आज ह्या डोळ्यातले पाणी हरवले आहे
जे जे घडले त्याची आठवणसुद्धा आज हरवली आहे
पहावी तिथे तापलेली वाळू....वर थरथरणारे पारदर्शक आभास
क्षितिजापर्यंत पसरला आहे एकच कोरडा रैताड विस्तार

ह्या तप्त वाळूवरून येऊ का धावत तशी....त्या आवेगाने
म्हण ना एकदा तरी....एकदा तरी....घाल ना ती जुनी हाक
ये ना धावत तूही असाच....ह्या माझ्याच वेगाने
टाक ना चिरडून घट्ट मिठीत हे गळलेल्या पाकळ्यांचे फूल
येऊ दे ना नसानसातून जुन्या जखमांचा पूर....परत...प्रचंड
भिजू दे...भिजू दे...तुझ्या माझ्या रक्तात
हे तापलेले वाळवंट...अफाट...


SATHE

कोसळत आहेत कवितेच्या धारा...
काही अंगावर...काही पलीकडे
भिजते आहे थोडी थोडी...अवघी निथळतही नाही
भरून आले आहे आकाश...शब्द कसे दाटून आले आहेत
किती उग्र...किती तेजस्वी...मीच डोळे मिटून घेतले आहेत
नाही सहन होत हा आघात...ह्या क्षणी देह विकला आहे
कविताही वैरीण अशी...नेमकी वेळ साधून येते
का गात आहे कुठे तरी...कुणी तरी...
सुरेल स्वरांची भिर्कावून भिंगरी

का भरला आहे सूक्ष्म गंध आत्म्याला आतून पेटवणारा
का दाटली आहे गूढ संध्याकाळ
काळोखाच्या मिठीत कोसळणारी
का भरू लागले आहे पाणी
डुचमळत्या लाटांनी व्यापीत किनारा
का सुटला आहे वारा...
का सळसळताहेत पिंपळावरली पाने
कोण कुठून उतरत आहे गरम रक्ताला झपाटत पुरतेपणी

तूही कसा पसरत आला आहेस
अशा वेळी परमेश्वराच्या छायेसारखा
का विकला आहे मी माझा देह साक्षात्काराच्या दिव्य क्षणी !


SATHE

ही कविता....जी लिहिली केवळ तुझ्यासाठी....तुझ्यामुळे
ही कविता....जी लिहिताना दाटून आले शरीर ओतप्रोत
हिंदकळत होता आत्मा फोडून कवच मुक्त होण्यासाठी
असह्य....असह्य झाला होता बंदिवास दीर्घ मुदतीचा
पण गहिवरले होते मन....डोळे भरून आले होते
पहाटेच्या प्रकाशाप्रमाणे गोंजारीत होते स्वप्न तुझेंच

म्हणून लिहिली ही कविता....देऊन ताण वेदनेचा
भरली जिच्यातून प्राणांची तडफड बंदुकीच्या दारूसारखी
दिली भिरकावून शरीराच्या आगीत निरुपयोगी लक्तराप्रमाणे
चढली होती पेटवताना नशा आत्मनाशाची....बेसुमार
स्फोट झाला....पण कल्पनाही नव्हती....बेहोषी उतरली नव्हती
तडातड उडाल्या ठिणग्या झिजवलेल्या आयुष्याच्या शतकोटी

तीच ही कविता जी लिहिली तुझ्यासाठी....तुझ्यामुळे
जिच्यातून जळणारे शरीर माझे...माझ्याहून तुझे...आणि कवितेचेही



असेच आपले म्हणाले एकदा कुणीतरी
दात विचकून माझ्याबद्दल सभ्यपणे
करीत असतात अधून मधून ह्याही कविता हौसेने
त्या दिवशी हृदयात अडलेल्या उत्तराचा आक्रांत
आज भडकला आहे
ओकीत असतो सर्प जसा सारे गरळ अंतर्यामी साठलेले
भडभडून सांगते तशीच....नाही करीत काहीसुद्धा हौसेने....
कविता तर नाहीच

अनेक वेळा मरता मरता जिवंत होऊन उठले आहे
हिला जन्म देण्यासाठी
किंबहुना जगवले आहे ईश्वराने आजपर्यंत
हिला जिवंत ठेवण्यासाठी
कित्येक अरण्ये तुडवली हिच्या शोधार्थ—
कित्येक गुहांतून फिरले चाचपडत
कितीदा विनवण्या केल्या ईश्वराच्या,
किती पसरले हात दयेसाठी
किती किती आक्रोश केला, ऊर बडवला,
लोळले गडबडा मातीवर
अशी तपश्चर्या केली जाळीत सारे शरीर,
अंतःकरण, बुद्धि, आत्मा
नाही सोडली हिची पाठ असंख्य वेळा चेष्टेचा विषय होऊनही
अशी जगले मरत मरत हिच्यातील
अमृताच्या एकेक कणासाठी

हिच्यासाठी जाळलेले सारे आयुष्य सापडेल हिच्याच शब्दातून
हिच्या प्रत्येक ओळीतून आहे आत्म्याची तळमळ
हिच्या शुद्धतेसाठीच
हिच्या आकारात आहे सुंदर स्वप्न हिचेच....
जे पहात आले जन्मभर
हीच आहे सारे काही....हीच माझे सर्वस्व....ही म्हणजे मीच
ही माझी सारी कविता....एवढेच माझे पुण्य....आणि पापही



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय
अनुक्रम ७३७१३ वि: काव्य
क्रमांक १८३६ नों. दि. 3/3/69

किती क्रूर वाटतो आहे हा आजचा पाऊस
कोसळताहेत असंख्य टाचण्या वरून खाली
होत नाही धड एखादी जखमही म्हणण्यासारखी

दूर सरकताहेत मोटारी ओल्या रस्त्यांवरून रपरपत
दूर दूर पळताहेत सारे ध्वनी जवळ न येता
सगळे जग पसरले आहे पलीकडून पलीकडे

या वेळी मी कुठे आहे ? कुठे हरवले आहे ?
काही सुद्धा जवळ नाही....एखादी आठवणही
किती क्रूर वाटतो आहे हा आजचा पाऊस


SATHE

नाही रे झोप येत अशा वेळी....आठवणी जाग्या होतात
नाही रे सोबत आज चंद्राची....नाही रे पृथ्वी प्रकाशात

नाही रे तेज चांदण्यांना....जमले आहेत ढग केवढे तरी
मंदावल्या आहेत वाहतानाच वाऱ्याच्या संथ लहरी

नाही रे खूण अस्वस्थतेची एवढीसुद्धा ह्या जगड्व्याळ पसाऱ्यात
मग मीच का व्हावे बेचैन झुगारून निद्रेचा पाठीवर फिरणारा हात

बुडाला असशील का खोल तू तिथे आठवणींच्या पुरात
मग कशी बुडवीत नाही मला उंच उसळलेली एखादी लाट


SATHE

सुरु झाला आहे प्रवास पुन्हा एकवार
जो संपत नाही कधीच....संपल्यावरही

कुठून सुरू होते...कुठे पोचते ही वाट
निघालेल्या पावलांना माहीत नव्हते....अजूनही नाही
कुठून आरंभ झाला....कसा घडणार आहे शेवट
किती अकल्पित घडते आहे सारे....किती वेगात
कुठवर चालणार हे द्वंद्व....किती घाव बसणार आहेत प्राणात

पुन्हा एकवार दिले आहे आव्हान मी भविष्याला
हरले तरी बेहत्तर....पाहणार आहे पुन्हा लढून
बहरले आहे हृदय माझे अशा अवेळीच
उचलली आहे मान प्रत्येक पाकळीने उत्कंठित होऊन

धरली आहे दिशा एकच जी पोचते थेट तुझ्यापर्यंत
येताना झाले आहे बेभान....अनावर....व्याकुळ...अत्यंत



सापडतील का शब्द असे
असेल ज्यांना धार माझ्या उत्कट इच्छांची
असतील का जळजळीत जे अत्यंत
जसे जळते हृदय माझे सक्तीचे ओझे वाहताना

फुटतील का तापून जे तडातड जसा फुटतो
संताप माझा निराशेनंतरचा
कोसळतील का जे असहाय्यपणे
जसे ढळतात अश्रू माझे भरभरून वाया जातांना
धुमसतील का जे करीत राख अंगांगाची
जसा करतो तिरस्कार माझ्या भावनांची
चिरतील का अंतःकरण जे चराचर
जसा जातो छेदीत मत्सर तुझ्याविषयीच्या आसक्तीला
असतील का तरीही जे नितांतकोमल
जसे असतात डोळे व्याकुळपणे तुला बघताना
पण सरणार नाही साठा ज्यांचा
जसे जाते संपून शरीर पुन्हा पुन्हा आत्मा अर्पण करताना


SATHE

इलाजच नव्हता म्हणून कवितेत घुसले
थकवा आला होता भयंकर तिच्यावाचून जगताना
त्याहून आला तिला भेटण्याच्या कल्पनेने

निघाले तोडून पाश तटातट अत्यंत क्रूरपणे
येईल का देता सर्वस्व मला अत्यंत निष्ठेने
जसे देता आले आजपर्यंत एकवटून प्रेम मिठी मारताना
फुटतील का बंध शरिराचे....उसळेल का रक्त उत्तुंग
नाही ना भरकटणार आत्मा दूर कुठेतरी...अर्पण करताना
हे दाटून आलेले अनावर कढ...
घडेल यांचा मृत्यु कवितेतच
कवितेत....कवितेसाठी मरताना मिळेल
त्यांना मुक्ती नित्य वांछिलेली

इलाजच नव्हता म्हणून कवितेत घुसले
पण लागेल का सूर उंच पूर्वीइतकाच
किंवा त्याहूनही उंच....उंच....



किती बोलून गेले हे फूल जे दिलेत तुम्ही मला
तुमची गूढ नजर भिडवून माझ्या नजरेला
बोलता येत नाही फुलाला....बरे झाले....
भलतेच बोलले असते
नसते ऐकले मी ते....ऐकण्याचे धैर्य झाले नसते

शब्दावाचून कळणारे कसे कळले असते
जर या निष्पाप फुलाला बोलता आले असते
किती बोलून गेले हे फूल....
कुठून शिकवलीत ही भाषा फुलाला
किंवा शिकलात फुलाकडून....शिकवलीत त्याची त्यालाच

ही तुमची भाषा....जी समजते फक्त फुलाला
कारण शिकवते फुलाची भाषा फूल फुलातून फुलाला


SATHE

अनुक्रम ७३५९२ .... वि: काव्य:
क्रमांक ११६ ३१३१७९.

## येशील का माझ्यासह समुद्रावर

हा धुक्याचा समुद्र ओलांडून
या प्रसन्न प्रफुल्लित प्रभातसमयी....
परमेश्वराची पवित्र सकाळ उगवताना
येशील का माझ्यासह समुद्रावर
वाळूचा सर्द संभार तुडवीत जिवंत पाण्यापाशी
बघितलेस! निद्रित आहे नगर
पलीकडच्या तीरावर धुके पांघरून निर्धास्त
बघितलास! कुरवाळतो आहे उन्हाचा
कोमल स्पर्श समुद्राच्या निळ्या विस्ताराला
बघितलेस! कसे ओळीने आरूढ झाले आहेत
शुभ्र समुद्रपक्षी दीर्घ लाटेच्या सळसळत्या चैतन्यावर
जशी जशी सरकते लाट तसे तसे पसरतात पंख....
उंचावतात माना....विस्फारतात चकित नेत्र
पहा....कशी झळकताहेत त्यांची सुडौल निकोप
शुद्ध शरीरे समुद्राला भिडलेली
घुमतो आहे किनाऱ्यावरच्या एकांतात
त्यांच्या कंठातील आकुल कलरव....क्वचित कलकलणारा
समुद्रावर उमललेल्या श्वेतकमलांसारखे
असंख्य असंख्य समुद्रपक्षी
एकासारखे एक....जसे अवतरले आहेत
प्रकाशाचे दिव्य दूत
पसरले आहेत पाण्यावर....उतरले आहेत किनाऱ्यावर
फडफडतात वाऱ्याचे झोत....
उघडतात आपले पंख तेव्हां अलगद
तरंगत जातात हवेवर जसे तरंगतात
सहज आपल्याच तंद्रीत समुद्रावर
ही सकाळ....हा समुद्र....हा किनारा....हा एकांत
हे प्रभातमय....समुद्रमय समुद्रपक्षी....असंख्य....असंख्य
तूही बघशील....तूही बघशील केव्हातरी
माझ्यासह माझ्याच डोळ्यांनी
पण येईल का होता आपल्याला समुद्रमय....
प्रभातमय....ह्या समुद्र पक्ष्याप्रमाणे?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे क्र. २८५३८

REFBK-0017538
REFBK-0017538